ग्राहक गा-हाणे निवारण मंच
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
औरंगाबाद परिमंडळ औरंगाबाद.

**Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone No.2336172**

No,CGRF /AZ/AZ/AUR/ PBN/ 170 /2009 / 04/ Date :- 07.01.09

To,
The Executive Engineer ( Administration)
O/O Superintending Engineer
O&M Rural Circle, M.S.E.D.C.L.,
Parbhani

Sub :- Forwarding of grievance in respect of Shri Sahebrao Vithoba Solav, r/o Barbadi, Tal.Purna, Dist.Parbhani ( Con.No.547150001306)

Dear Sir

**Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum from. Shri .** Sahebrao Vithoba Solav, r/o Barbadi, Tal.Purna, Dist.Parbhani ( Con.No.547150001306)

**The consumer has requested for passing an interim order for not to disconnect his supply on account of excess bills.**

You are requested to submit your parawise reply at the time of hearing which will be held on **17.01.2009 at 15.00 Hours at Training Hall, MSEDCL , Mastgad, JALNA**

Member Secretary
CGRF, (AZ) MSEDCL,
Aurangabad.

Encl: As above

Copy to:- Shri Sahebrao Vithoba Solav, r/o Barbadi, Tal.Purna, Dist.Parbhani ( Con.No.547150001306)

## ग्राहक गा-हाणे निवारण मंच
## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/परभणी/१७१/२००९/०५**

**तक्रार दाखल दिनांक ;- ०७/०१/२००९**
**निकाल दिनांक ;- ०४/०२/२००९**

**श्री साहेबराव विठोबा सोलव,**
**बरबडी ता.पुर्णा,**
**जिल्हा परभणी.**
**(ग्राहक क्र.५४७१५०००१३०६) अर्जदार/ग्राहक**

**विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**परभणी.**

**गैरअर्जदार**

| | | |
|---|---|---|
| **कोरम** | **विष्णु अं. हंबिरे** | **अध्यक्ष** |
| | **हेमंत अ. कापडीया** | **सदस्य** |
| | **प्र. अ. सगणे** | **सदस्य/सचिव** |

# आदेश

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत

तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक ०७/०१/२००९ रोजी परभणी मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी, परभणी यांना पाठविण्यात आली.याप्रकरणाची सुनावणी दिनांक १७/०१/२००९ घेण्याबाबत दोन्ही बाजुना कळविण्यात आले.

अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) अर्जदाराने, बडबडी, ता.पुर्णा येथे घरगुती वापरासाठी महावितरण कंपनीकडुन वीज पुरवठा घेतला असुन त्यांना महावितरण तर्फे चुकीचे वीज बिल आकारण्यात आले. याबाबत त्यांनी केलेल्या तक्रारीची दखल घेण्यात आली नाही. अर्जदाराने महावितरणच्या अंतर्गत तक्रार निवारण कक्षा कडे दिनांक १६/१०/२००८ रोजी याबाबत तक्रार केली पण त्यांना कोणताही प्रतिसाद न मिळाल्यामुळे अर्जदाराने मंचात ही तक्रार दाखल केली असुन महावितरण कंपनीस सुधारीत वीज बिल देण्याबाबत तसेच चुकीच्या वीज बिलापोटी वीज पुरवठा खंडीत न करण्याबाबतचे आदेश देण्याची विनंती मंचात केली आहे.

२) दिनांक १७/०१/२००९ रोजी घेण्यात आलेल्या सुनावणीस अर्जदार प्रतिनिधी श्री विश्वनाथ भायेकर तसेच नोडल अधिकारी यांचे अधिकृत प्रतिनिधी श्री भारती उपस्थित होते. नोडल अधिकारी प्रतिनिधीने मंचात दाखल केलेल्या सी.पी.एल वरून मार्च २००७ पासुन अर्जदारास सरासरीवर आधारीत वीज बिल देण्यात आल्याचे दिसुन आले. तसेच ही बिले चुकीची असल्याचे त्यांनी मान्य केले व अर्जदारास सुधारीत वीज बिल देण्याची तयारी दर्शविली. मंचाने दोन्ही बाजुचे म्हणणे ऐकल्यानंतर व अर्जदारास चुकीचे वीज बिल देण्यात आल्याचे आढळुन आल्यामुळे त्यांचा वीज पुरवठा खंडीत न करण्याबाबत महावितरण कंपनीस अंतरिम आदेश दिला व याप्रकरणाची पुढील सुनावणी २०/०१/२००९ रोजी घेण्याचे निश्चीत केले.

३) दिनांक २०/०१/२००९ रोजी घेण्यात आलेल्या सुनावणीस अर्जदार प्रतिनिधी व परभणी विभागाचे नोडल अधिकारी श्री कटकुरी उपस्थित होते. त्यांनी स्थळपाहणी अहवाल,मीटर बदली अहवाल तसेच वीज बिल दुरूस्ती प्रस्तावाची प्रत मंचात दाखल केली.याची एक प्रत अर्जदार प्रतिनिधीस देण्यात आली.अर्जदार प्रतिनिधीने या वीज बिल रिव्हीजनमध्ये व्याज व दंड कमी करण्यात आले नसल्याचे मंचास सांगितले. मंचाने नोडल अधिकारी यांना सुधारीत वीज बिल दुरूस्ती अहवाल दाखल करण्याचे सांगत प्रकरण निकालासाठी ठेवले.

४) अर्जदार व महावितरणचे नोडल अधिकारी यांनी दाखल केलेल्या कागदपत्रा वरून तसेच अर्जदाराच्या सी.पी.एल.ची पाहणी केल्यावर मंचास असे आढळुन येते की, फेब्रुवारी २००७ पर्यत दोन्ही पक्षामध्ये वीज बिलाबाबत वाद नव्हता. मार्च २००७ मध्ये महावितरण कंपनीतर्फे अर्जदारास मागील रिडींग ४३५० व चालु रीडींग ९३८५ दर्शवित, असे दर्शवित ५०३५ युनिट वीज वापराचे (घरगुती) बिल आकारण्यात आले. त्यानंतर कधी लॉक तर कधी फॉल्टी स्टेटस दाखवुन त्यांना सरासरीवर आधारीत जास्त वीज वापराचे बिल आकारण्यात आले. दिनांक २९/०७/२००७ रोजी अर्जदाराचे जुने मीटर क्रमांक ५४९५७६ बदलण्यात आले, त्यावेळी मीटर वरील रिडींग ५९३१ अशी असल्याचे दिसुन येते.अर्जदाराच्या येथे लावण्यात आलेल्या नवीन मीटर क्रमांक ५४३३७११ वरील रिडींग ००००१ असल्याचे नमुद केलेले आढळुन येते. दिनांक १५/०१/२००९ रोजी या नवीन मीटरची रिडींग २३६७ अशी असल्याचे आढळुन येते. यावरून अर्जदाराचा वीज वापर मार्च २००७ ते २९/०७/२००७ पर्यत (५९३१-४३५०)-१५८१ युनीट तसेच ३०/०७/२००७ ते १५/०१/२००९ पर्यत (२३६७-०००१)-२३६६ युनिट असा असल्याचे स्पष्ट होते.

वरील सर्व बाबीचे निरीक्षण केल्यावर महावितरण कंपनीतर्फे अर्जदारास मार्च २००७ नंतर सतत चुकीच्या वीज बिलाची आकारणी करण्यात आल्याचे स्पष्ट होते. अर्जदाराने चुकीच्या वीज बिलाबाबत केलेली तक्रार योग्य असुन अर्जदाराच्या तक्रारीची दखल न घेणे, सतत चुकीच्या वीज बिलाची आकारणी करणे ही सेवेतील त्रुटी म्हणुन मानण्यात येत असुन अर्जदार नुकसान भरपाई मिळण्यास पात्र आहे. असे मंचाचे मत आहे.

# आदेश

१) महावितरण कंपनीने अर्जदारास मार्च २००७ ते २९/०७/२००७ या काळासाठी १५८१ युनीट तर ३०/०७/२००७ ते १५/०१/२००९ या काळासाठी २३६६ युनीट वीज वापराचे बिल विभागुन अर्जदारास तीस दिवसात सुधारीत वीज बिल द्यावे.

२) वरील प्रमाणे देण्यात येणा-या सुधारीत वीज बिलात कोणतेही व्याज व दंड आकारण्यात येवु नये व या काळात अर्जदाराने भरलेल्या रक्कमेची वजावट या सुधारीत वीज बिलातुन करावी.

३) महावितरण वीज कंपनीने अर्जदाराच्या तक्रारीची दखल न घेतल्यामुळे त्यांना झालेल्या मानसिक त्रासापोटी रूपये ५००/- नुकसान भरपाई ३० दिवसात द्यावी.

वरील आदेशाचे ग्राहक व महावितरण कंपनी यांनी पालन करावे व त्याबाबत मंचास कळवावे.

गा-हाणे निकाली काढण्यात आले असुन हे ग्राहकास व वितरण कंपनीस कळवावे.

| | | |
|---|---|---|
| **हेमंत अ. कापडिया** | **प्र. अ. सगणे** | **विष्णु अं. हंबिरे** |
| **सदस्य** | **सदस्य/सचिव** | **अध्यक्ष** |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

**क्र.सीजीआरएफ/एझेड/परभणी/१७१/२००९/०५** **दिनांक ;-**

**प्रति,**
**श्री साहेबराव विठोबा सोलव,**
**मु.पोस्ट बडबडी ता. पुर्णा,**
**जिल्हा परभणी.**

( तक्रार क्र.सिजीआरएफ/एझेड/परभणी/१७१/२००९/०५ )

आपण दिनांक ०७/०१/२००९ रोजी दाखल केलेल्या तक्रारीवरील या मंचाचा आदेश सोबत जोडला आहे. हा आदेश मान्य नसल्यास आपण विद्युत लोकपाल यांच्याकडे ६० दिवसाच्या आंत अपिल दाखल करू शकता.

**प्रत,**
**कार्यकारी अभियंता (प्रशासन),**
**अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,**
**म.रा.वि.वि.कं.म. परभणाी मंडळ,परभणी.**

**सदस्य/सचिव**
**ग्राहक गा-हाणे निवारण मंच**
**म.रा.वि.वि.कं.म.औरंगाबाद.**

**विद्युतलोकपालाचा पत्ता,**
**विद्युत लोकपाल,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,**
**६०६-६०८, केशवा,**
**बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.**
**दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.**